# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी "
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व),
मुंबई :- ४०० ०९३
दिनांक :- 25/06/19

क्र. मऔविम/भू-विभाग/(मावतं)/ C09065

## परिपत्रक

विषय :- माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा पोटभाडयाने (Sub-letting )देणेबाबत.

संदर्भ :- परिपत्रक क्र मावतं/६९९७७, दिनांक ०५/०३/२०१३.

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा पोटभाडयाने देण्यासंदर्भात संदर्भीय परिपत्रकान्वये मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत. तथापि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेली घसरण, जागतिक आर्थीक मंदी तसेच या क्षेत्रातील उद्योजकांकडून पोटभाडयापोटी आकारण्यात येत असलेले दर कमी करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या सुचना/निवेदने विचारात घेता, माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा (बांधीव क्षेत्र) पोटभाडयाने देण्यासाठी पोटभाडे शुल्काचे दर कमी करण्याबाबतचा विषय महमंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०१/०३/२०१९ रोजी झालेल्या ३८० व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर विषयाबाबत चर्चा होऊन ठराव क्रमांक ५८८२ पारीत करण्यात आला.

संचालक मंडळाच्या पारीत ठराव क्र ५८८२ नुसार माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागा पोटभाडयाने (Sub-letting )देणेबाबत सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत असून ती खालील प्रमाणे :-

१) माहिती तंत्रज्ञान उद्यान आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थीक क्षेत्रातील तसेच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यान इमारतीतील गाळे पोटभाडयाने देतांना औद्योगिक अथवा व्यापारी वापरानुसार त्या त्या वर्षीच्या प्रचलित प्रिमियम दराच्या १ टक्का प्रती चौ.मी. प्रती वर्ष ऐवजी ०.५ टक्का प्रती चौ.मी. प्रती वर्ष या प्रमाणे पोटभाडयाची रक्कम आकारण्यात यावी.

२) माहिती तंत्रज्ञान उद्यान आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थीक क्षेत्रातील तसेच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यान इमारतीतील गाळे पोटभाडयाने देण्याच्या कार्यपध्दती मध्ये सुगमता (Procedural

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

Simplification) आणण्यात येऊन अर्ज तपासणी, पोटभाडयाची रक्कम ऑन लाईन स्विकारणे, परवानगी देण्याची ऑन लाईन कार्यपध्दती याबाबत कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

३) सदरहू धोरण या परिपत्रकाच्या दिनांकापासून फक्त माहिती तंत्रज्ञान उद्यान आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थीक क्षेत्रातील तसेच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यान इमारतीतील गाळे पोटभाडयाने देण्याकरिता लागू राहिल.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(अभिषेक कृष्णा)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मावतं)
मऔविम,मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग, प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अति. मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पूणे/औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमी) महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमी-१/२) मऔविम,मुंबई.
८. प्रशाकिय अधिकारी मऔविम,मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन ड) मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जि.उ.के.
१३. सर्व औद्योगिक संघटना.
१४. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतीक व्यापारी केंद्र, कफ परेड, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in